छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण व मानव विकास संस्था (SARTHI) ही संस्था स्थापन्याच्या संदर्भात पूर्वतयारीसाठी गठीत मार्गदर्शन समितीस मुदतवाढ देणेबाबत.

महाराष्ट्र शासन

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,

शासन निर्णय क्र.सी.बी.सी.१०/२०१७/प्र.क्र.२/मावक

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२

दिनांक : १३ नोव्हेंबर, २०१७.

<u>वाचा</u> : १. शासन निर्णय क्र.सी.बी.सी.-१०/२०१७/प्र.क्र.२/मावक, दि.०३ जानेवारी, २०१७.

२.शासन निर्णय क्र.सी.बी.सी.-१०/२०१७/प्र.क्र.२/मावक, दि.०५ जुलै, २०१७.

<u>प्रस्तावना:</u>

संदर्भाधीन शासन निर्णय क्र. १ अन्वये मराठा, कुणबी व शेती व्यवसायातील बहुजन समाज यांच्या सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक विकासावर प्रकर्षाने लक्ष देण्यासाठी तसेच त्यांचे प्रश्न जाणून घेणे, त्याचा सविस्तर अभ्यास करणे, त्यावर उपाययोजना सुचविणे, यासाठी छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण व मानव विकास (Chhatrapati Shahu Maharaj Research, Training and Human Development Institute (SARTHI)) स्थापना करण्याचे प्रस्तावित आहे. त्यानुषंगाने पूर्व तयारीकरिता शासनास मार्गदर्शन व शिफारस करण्याकरिता श्री.सदानंद मोरे (साहित्यिक), अध्यक्ष आणि श्री.डी.आर.परिहार, सेवानिवृत्त भारतीय वन सेवा अधिकारी तथा माजी महासंचालक, डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), सदस्य यांची मार्गदर्शन समिती गठीत करण्यात आली आहे. तसेच सदर समितीचे कामकाज सुरु करण्याकरिता सदर समितीस मनुष्यबळ व इतर सोयीसुविधा संदर्भाधीन क्र. २ येथील शासन निर्णयान्वये उपलब्ध करुन देण्यात आल्या असून सदर समितीचा कार्यकाल ३ महिने इतका निश्चित करण्यात आला आहे. सदर समितीच्या कामकाजाचा आवाका पाहता सदर समितीस अहवाल सादर करण्यास अधिकचा वेळ लागणार असल्यामुळे सारथी मार्गदर्शन समितीस मुदतवाढ देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

<u>शासन निर्णय</u> :

१. संदर्भाधीन क्र. २ येथील शासन निर्णयान्वये सारथी मार्गदर्शन समितीची कार्यकक्षा निश्चित करण्यात आली आहे. त्याअनुषंगाने, बैठक, परिसंवाद व कार्यशाळा,इत्यादी आयोजित करण्यास सारथी मार्गदर्शन समितीस मान्यता प्रदान करण्यात आली आहे. सदर मान्यतेस अनुसरुन मराठा, कुणबी व शेती व्यवसायातील बहुजन समाजाच्या सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक विकासाचा अभ्यास करुन त्याप्रमाणे प्राप्त सूचनांचा समितीच्या अहवालातअंतर्भाव करण्याकरिता विविध क्षेत्रातील मान्यवर तज्ञ, माजी सनदी अधिकारी, कृषितज्ञ, उद्योजक, शिक्षणतज्ञ, महिला उद्योजक, इत्यादी मान्यवरांच्या अंदाजित १५ कार्यशाळा समितीने प्रस्तावित केल्या आहेत. त्यापैकी समितीमार्फत यशदा, पुणे व इतर ठिकाणी एकूण ४ कार्यशाळांचे आयोजन करण्यात आले. या व्यतिरिक्त राज्यातील व राज्याबाहेरील विविध शैक्षणिक व संशोधन केंद्र, विद्यापीठे, शासकीय कार्यालये,मंत्रालयीन विभाग इत्यादी ठिकाणी प्रत्यक्ष भेटी देवून त्यांच्या कामकाजाची पाहणी करणे व त्यांचेकडील डाटा संकलीत करणे व तेथील तज्ञांचे मार्गदर्शन घेणे इत्यादी कामकाज समितीतर्फे होणे आवश्यक आहे. उपरोक्त वस्तुस्थिती विचारात घेता शासनाकडून सारथी मार्गदर्शन समितीस अहवाल सादर करण्यास दिलेला अवधी अपुरा ठरत असल्याने सारथी मार्गदर्शन समितीस दि. ३१ डिसेंबर, २०१७ पर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे.

२. महासंचालक, बार्टी, पुणे यांनी उपरोक्त नमूद सारथी मार्गदर्शन समितीच्या वाढीव मुदतीकरिता येणारा सर्व खर्च बार्टी, पुणे या संस्थेकडे मराठा आरक्षणाकरिता उपलब्ध निधीतून भागवावा. बार्टी संस्थेने वरीलप्रमाणे समितीकरिता मराठा आरक्षणाकरिता उपलब्ध निधीमधून खरेदी केलेले सर्व साहित्य भविष्यात स्थापन होणाऱ्या "सारथी" संस्थेकडे वर्ग करण्यात यावे.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१७१११७१६०२४५१४२२ असा आहे. हा आदेश डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Dinesh
Ramchandra Dingle

Digitally signed by Dinesh Ramchandra Dingle
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Social Justice And Special Assistance Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=8612f2011cf8cde3b074d561cd711c17c6c3fd836467a8648a8d21dc84bc01be, cn=Dinesh Ramchandra Dingle
Date: 2017.11.17 16:05:58 +05'30'

(दि.रा.डिंगळे)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा. राज्यपाल यांचे सचिव,
२. मा. मुख्यमंत्री यांचे सचिव,
३. मा. मंत्री (सामाजिक न्याय) यांचे खाजगी सचिव,
४. मा. राज्यमंत्री (सामाजिक न्याय) यांचे खाजगी सचिव,
५. विरोधी पक्षनेते, विधानसभा, विधान भवन, मुंबई
६. विरोधी पक्षनेते, विधान परिषद, विधान भवन मुंबई
७. महालेखापाल, महाराष्ट्र , मुंबई/नागपूर
८. प्रधान सचिव, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय,मुंबई
९. प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, मंत्रालय,मुंबई
१०.सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग यांचे वरिष्ठ स्वीय सहायक
११.सर्व विभागीय आयुक्त (महसुल)
१२.महासंचालक, डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था , पुणे.